महाराष्ट्र शासन
पोलीस आयुक्त कार्यालय, नाशिक शहर
गंगापुर रोड, नाशिक - ४२२ ००२
Office Phone - 0253-2305218, Fax -0253-2305219, Email ID - cp_nashik@mahapolice.gov.in

**पोलीस आयुक्त, नाशिक शहर या आस्थापनेवरील विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी जाहिरात**

24 FEB 2026

क्रमांक: कक्ष-१/अधि.आस्था/विअभरती/१४८६/२०२६, नाशिक शहर दिनांक. /०२/२०२६

पोलीस आयुक्त, नाशिक शहर आस्थापनेवरील खालील नमूद विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी यांची पदे ११ महिन्याचे करारावर पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत.

| अ.क्र | पदनाम | पदसंख्या | एकत्रित अनुज्ञेय मासिक वेतन + दुरध्वनी व प्रवास खर्च |
|---|---|---|---|
| १ | विधी अधिकारी वर्ग-ब | ०१ | रु.२५००० + ३०००/-<br>(एकूण अक्षरी रक्कम रुपये अट्टावीस हजार फक्त ) |
| २ | विधी अधिकारी | ०१ | रु.२०००० + ३०००/-<br>(एकूण अक्षरी रक्कम रुपये तेवीस हजार फक्त ) |

**सुचना:-**

१) विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या पदांकरीता करावयाचे अर्ज पोलीस आयुक्त, नाशिक शहर, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ यांचे कार्यालयात किंवा पोस्टाने दिनांक **२७/०२/२०२६ ते ०६/०३/२०२६** पर्यंत १०.०० ते १८.०० वा. या कार्यालयीन वेळेत सादर करावेत. शासकीय सुटट्रीचे दिवशी कार्यालयात अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

२) या कार्यालयात दिनांक **०६/०३/२०२६ चे १८.००** वाजेनंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच पोस्टाने दिनांक **०६/०३/२०२६ चे १८.००** वाजेनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

३) अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे. प्रत्येक पदासाठी पात्र उमेदवारांनी स्वतंत्र अर्ज करावेत. सदर अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजुस ठळक अक्षरात विधी अधिकारी गट-ब पदासाठी अर्ज/ विधी अधिकारी पदासाठी अर्ज असे नमुद करावे. विहीत नमुन्यातील पुर्ण भरलेल्या अर्जासोबत पासपोर्ट साईजचे ०२ फोटो व पत्रव्यवहारासाठी उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव यांच्या सांक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्या.

४) अर्जाचा नमुना https://nashikcitypolice.gov.in/ या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेला आहे.सदर अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन अर्ज परिपुर्णरित्या भरावा.

५) परिक्षा शुल्क रु. १०००- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) टरविण्यात आले असुन, सदर परिक्षा शुल्क केवळ Demand Draft द्वारे स्विकारण्यात येईल. त्यामुळे अर्जासोबत नमुद रकमेचा " P.A. TO CP" यांचे नांवे असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा Demand Draft अर्जासोबत जोडावा. अर्जासोबत Demand Draft नसलेले अर्ज बाद टरविण्यात येतील, यांची नोंद घ्यावी.

**विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या पदांकरीता शैक्षणिक अर्हता वय व अनुभव:-**

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर व तो सनद धारक असेल.

२) विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या दोन्ही पदांसाठी वकीली व्यवसायाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

३) उमेदवारास गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासकीय अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञान असेल. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

५) उमेदवाराचे वय :-
अ) विधी अधिकारी वर्ग-ब पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी (६०) वर्षांपेक्षा जास्त नसेल.
ब) विधी अधिकारी पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी (६०) वर्षांपेक्षा जास्त नसेल.

६) जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यां 'विषयक सखोल ज्ञान असेल त्याच प्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**<u>विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या पदांची कर्तव्ये व जबाबदा-या:-</u>**

१) कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदे विषयक / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२) सेवाविषयक / प्रशासकीय बाबी /विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.

४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-यांची मान्यता घेवून न्यायालयात / न्यायाधिकरणात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधीत सरकारी वकिलांकडे पाठविणे व अपिलाचा अंतीम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७) विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुण दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८) पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

९) कायदा , सेवा व प्रशासनासंबंधी इतर अनुषंगीक कामे.

**<u>अटी व शर्ती</u>**

१) मा.सर्वोच्च न्यायालयासमक्ष न्यायप्रविष्ट असलेल्या विशेष हक्क याचिका (Civil) २४७८८ व २४७८९/२०१२ (महाराष्ट्र शासनाच्या वतीने दाखल केलेल्या) चे अंतिम आदेशास अधिन राहून सदर पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात येतील.

२) सदर पदांची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल, उमेदवाराला शासकीय कर्मचारी/अधिकारी गणले जाणार नाही.

३) पोलीस आयुक्त, नाशिक शहर आस्थापनेवरील परिमंडळ तसेच विभागीय कार्यालय या ठिकाणी काम करणे बंधनकारक असेल.

४) सदर नेमणूका या करार पध्दतीने (विहित प्रपत्र परिशिष्ट ब प्रमाणे) प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी ( जास्तीत जास्त ०३ वेळा ११ महिन्यांकरीता ) वाढविता येईल ०३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतर अशा उमेदवारांना पुनश्च निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

५) निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकीली व्यवसायांशी संबंधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्रधिका-यांच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिका-याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने

खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रदद् करण्यात येईल.

६) हया व्यतिरीक्त खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे -

१. वर नमुद लेखी परिक्षा ५० गुणांची व तोंडी परिक्षा २५ गुणांची असेल.

२. लेखी परिक्षेत व तोंडी परिक्षेत प्राप्त गुण एकत्रित करून एकुण गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची कत्राटी पध्दतीने नेमणुक करण्यात येईल.

३. नियुक्ती देण्यासाठी कमीत कमी ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे.

७) लेखी परिक्षेकरीता व मुलाखतीकरीता मुख्यत्वे खालील नमूद बाबींवर प्रश्न विचारण्यात येतील.

अ. सेवाविषयक व फौजदारी स्वरुपाची प्रकरणे.

ब. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा प्रकरणात किंवा फौ.प्र.सं.१९७५ मधील कलम १९७ किंवा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम अधिनियंम,१९९९ मधील प्रकरणात अभियोग दाखल करण्यास दयावयाची परवानगी.

क.सेवाविषयक व फौजदारी प्रकरणातील वेगवेगळया व महत्वाच्या मुददयांवर सध्याची न्यायीक स्थिती (Settled position of Law)

ड. प्रचलीत फौजदारी कायदे (मेजर व मायनर ॲक्ट), मा. सर्वोच्च व उच्च न्यायालय व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण यांचे न्यायनिवाडे.

८) उमेदवाराला निवडप्रक्रियेसाठी कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

९) जे उमेदवार लेखी व मुलाखत परिक्षेत पात्र ठरतील अशा पात्र उमेदवारांकडून विहीत साक्षांकन नमुना फॉर्म भरुन घेण्यात येवून त्यांची चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी करण्यात येईल व त्यांनतरच त्यांना कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल.

१०) नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) करणे अनिवार्य राहील.

११) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिका-यांना एकत्रित वेतन व अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाच्या व्यतिरीक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

१२) उमेदवारांनी वर विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी जाहिरातीचे दिनांकापर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

१३) विहीत पात्रता धारण करणा-या उमेदवारांचे अर्ज अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले असल्यास तसेच आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती व डी.डी.नसलेले अर्ज नाकारण्यात येतील.

वरील पदे ही शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेशीत झाले आहे. निवड प्रक्रियेबाबतची कार्यवाही करणे, तसेच उमेदवाराची निवड कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही टप्प्यावर केव्हाही रदद् करण्याचे तसेच परिक्षेसंबंधीचे नियमात बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिका-यास राहतील.

**मा.पोलीस आयुक्त,**
**यांचे मान्यतेने.**

**(किरिथिका सी.एम.)**
**पोलीस उप आयुक्त,मुख्यालय**
**पोलीस आयुक्त कार्यालय,नाशिक शहर**

## अर्जाचा नमुना

## विधी अधिकारी वर्ग-ब व विधी अधिकारी पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

कार्यालयीन उपयोगासाठी

१. अर्ज क्रमांक | | | | | | | | |

२ अर्ज स्विकारल्याचा दिनांक | | | | | | | | |

३ अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी (दिनांकासह) ---------------------

फोटोवर स्वाक्षरी करावी

सुचना :- अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावे.

अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी आवश्यक नसेल तेथे खोडावे

### अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती

१) अर्जदाराचे संपुर्ण नाव :- आडनाव नाव वडिलांचे/पतीचे नाव

मराठीत : ----------------- ------------------- ------------------------

इंग्रजी : ----------------- ------------------- ------------------------

२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता : ----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

३) दुरध्वनी क्रमांक :- दूरध्वनी क्रमांक /मोबाइल क्रमांक --------------------------------------------------

४) जन्मतारीख (अंकात व अक्षरात) :- --------------------------------------------------

५) जाहिरातीचे दिनांकास वय:- -------------वर्ष----------महीने--------------दिवस

६) लिंग :- पुरुष /महिला ७) धर्म :-

८) जात :- ९) प्रवर्ग :-

१०) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय ? होय / नाही

११) शैक्षणिक आर्हता

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव विदयालय / महाविदयालय | बोर्ड / विदयापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०) अथवा जुनी ११ वी परीक्षा | | | | | |
| उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१२वी) | | | | | |
| पदवी | | | | | |
| विधी पदवी | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | |
| संगणक | | | | | |
| इतर | | | | | |

१२) अर्जदाराची इतर माहिती

अ) सनद घेतल्याचा दिनांक :-

ब) उमेदवाराने अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ? होय /नाही

क) उमेदराने स्वत : हाताळलेल्या केसेचा तपशिल

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

१३) (अ) अर्जदाराविरुध्द यापूर्वी कोणताही दखलपात्र अथवा अदखलपात्र गुन्हा दाखल आहे का ?

होय / नाही

(ब) अर्जदारावर या पुर्वी कोणत्याही अपराधा बाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात / बध्द करण्यात / दंड करण्यात / सिध्द दोषी ठरविण्यात आले आहे का, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्याच्या परीक्षांना / निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे का, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे का, किंवा कोणत्याही विदया पीठा कडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणीक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे का / काढून टाकण्यात आले आहे का ?

होय / नाही

(क) हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विदयापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणीक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवारा विरुध्द कोणतेही प्रकरण / विभागीय चौकशी प्रलंबित आहे का ?

होय / नाही

( १३-अ, १३-ब किंवा १३-क चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबधता, दंड, दोषसिध्दी,शिक्षादेश इ. संपुर्ण तपशिल आणि न्यायालय / विदयापीठ / शैक्षणिक प्राधिकरणात इ. ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरुप स्पष्ट करावे.)

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री / सौ / कु.---------------------------------------------------- या द्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो /करते की, वरील माहिती जाणिव पुर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असुन ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हता नुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्पावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्या बाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्ण पणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्या बाबतीत माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहील. तसेच मी भरती प्रक्रिये मध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

**ठिकाण :-**

**दिनांक :-** / /२०२६

अर्जदाराची स्वाक्षरी

अर्जदाराचे नाव ----------------------------------------

**सोबत :-** अर्जात नमुद केलेल्या बाबीच्या आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रति जोडण्यात याव्यात.